स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड .

सामजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत

समाजशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी करीता सादर करावयाचा संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेड

‘कातकरी जमातीतील महिला व बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास : पुणे जिल्हा’

‘A Sociological Study of the Health Problems of the Women and Children In Katkari Tribe : Pune District’

संशोधकः कदम सुनंदा वैजनाथ

मार्गदर्शकः डॉ . मोटे अशोक अर्जुनराव

सहयोगी प्राध्यापक , समाजशास्त्र विभाग ,

शिवाजी महाविद्यालय , रेणापूर .

संशोधन केंद्र

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय ,

लातुर

मार्च 2022

कातकरी जमातीतील महिला व बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांचा समाजशाजस्त्रीय अभ्यास पुणे जिल्हा

अनुक्रमणिका

। प्रस्तावना
2 संशोधन समस्या विधान
3 मुख्य संकल्पनांच्या व्याख्या / स्पष्टीकरण
4 संबंधित साहित्याचा आढावा
5 संशोधनाची उद्दिष्टे
6 गृहितकृत्ये
7 संशोधनाचे महत्त्व / गरज
8 संशोधन पध्दती
9 तथ्य संकलनाची तंत्रे
10 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा
11 संभाव्य प्रकरणीकरण
12 वेळापत्रक
13 संदर्भ ग्रंथ सूची

कातकरी जमातीतील महिला बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांचा समाजशाजस्त्रीय अभ्यास पुणे जिल्हा

१. प्रस्तावना :

आदिवासी या शब्दातच या शब्दाचा सखोल अर्थ दडलेला आहे . आदिवासी म्हणजे आद्य रहिवासी किंवा मूळचे रहिवासी होत . मूळचा रहिवासी समजला जाणारा हा समाज जंगलात , दुर्गम दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करताना दिसून येतो . नागरी संस्कृतीपासून व सुखसुविधापासून अलिप्त असणारा हा समाज निसर्गालाच आपली देवता मानून पूजा करतो . जंगलात दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करणाऱ्या या समाजासमोर असंख्य संकटे , अडचणी असतात , त्यावर मात करत जंगल हीच आपली माता समजून वनराईच्या सहाय्याने आपले जीवन फुलविण्याचा समाज करतो . मात्र नैसर्गिक संपत्तीचा वारसदार असणाऱ्या समाजाकडे अप्रगत , आदिम , रानटी , मागसलेले लोक म्हणूनच आजही पाहीले जाते . प्रयत्न दुर्गम भागात डोगरदन्यात वास्तव्य असल्याकारणाने विकासाची गंगा त्याच्यापर्यंत म्हणावी तितकी पोहचलेली दिसून येत नाही . आदिवासी बोलीभाषा बोलतात त्याला लिपी नसते त्यामुळे आदिवासी समाज निरक्षर असतात . निरक्षरता , अज्ञान , अंधश्रद्धा , शिक्षणाचा अभाव , दुर्गम भागात वास्तव्य ही त्यांच्या अप्रगत असण्याची काही कारणे सांगता येतील . महाराष्ट्रात आदिवासींच्या एकूण ४७ जमाती आढळून येतात . भिल्ल , गौड , महादेव कोळी , ढोर कोळी , टोकरे कोळी , पावरा , ठाकुर वारली , अंध , कोकणा , कातकरी , दुबळा , थोडीया , कोरकू इत्यादी जमाती आढळून येतात . १९५१ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार भारतात आदिवासी लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्राचा ४ था क्रमांक लागतो . महाराष्ट्रातील सह्याद्री विभागात मल्हार कोळी , ढोर कोळी , महादेव कोळी , वारली , कोकणा , कातकरी , ठाकुर , दुबळा , धोडीया इ . जमाती इथे प्रामुख्याने रायगड , ठाणे , रत्नागिरी , पुणे व नाशिक या जिल्हयात आढळते . त्यांची लोकसंख्या टक्केवारी टाटा सामाजिक संस्थेने २०१४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात पुढीलप्रमाने सांगितली आहे .

टाटा सामाजिक संस्थेचा अहवाल (२०१४)

जिल्ह्याचे नाव	लोकसंख्येची टक्केवारी
रायगड	43.34
ठाणे	32.91
रत्नागिरी	12.12
पुणे	5.09
नाशिक	2.55
इतर	3.99

महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात राहणारी एक अति प्राचीन वन्य जमात म्हणून कातकरी जमातीकडे पाहीले जाते . कातऱ्यांना कातोडी ' , ' कातवडी ' किंवा ' काथोडी ' असेही म्हणतात . यांची लोकवस्ती १९६१ च्या जनगणनेनुसार १,४३,२५५ इतकी आहे . ही जमात उंच डोंगरावर , दुर्गम दऱ्याखोऱ्यात जंगलात वास्तव्यास असते . प्रगत समाजापासून दूर असलेल्या १५ ते ५० चंद्रमोळी झोपडी असणाऱ्या त्यांच्या या वस्तीला कातवाडी म्हणून ओळखले जाते . आपल्या उदरनिर्वाहासाठी हे लोक पूर्णत : जंगलावर अवलंबून असलेले दिसून येतात . शिकार करणे , मासेमारी करणे , डीक गोळा करणे , रानमेवे , कंदमुळे , रानभाज्या , औषधी वनस्पती , खेकडे पकडणे , जंगलातील वाळलेली लाकडे विकणे अशी कामे ते आपल्या अपजिविकेसाठी करताना दिसून येतात .

कातकरी लोक , निष्णात शिकार असून तिरंदाजीतील त्यांचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे . कातकरी हे नाव त्यांच्या कात तयार करण्याच्या परंपरागत व्यवसायामुळे पडलेले आहे . या जमातीत अथावर धेड , सोन व वरप असे असे पाच पोटविभाग असून त्यांच्यात लग्नसंबंध होत नाहीत . ही जमात अतिशय दुर्गम भागात वास्तव्यास असल्या कारणाने विकासाची गंगा अजूनपर्यंत म्हणावी तितकी त्यांच्या पर्यंत पोहचली नाही . त्यामुळे ही जमात अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये आपले जीवन जगत असते . महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात शैक्षणिक व सांस्कृतीक वारसा लाभलेल्या पुण्यासारख्या प्रगत जिल्ह्यात सुद्धा ही जमात आजच्या घडीलाही अतिमागासलेली दिसून येते . अतिशय दुर्गम भागात वास्तव्य असल्या कारणाने शासनाच्या योजनांचा लाभ या दुर्गम भागात राहणाऱ्या लोकाना म्हणावा तितका होत नाही .

सामाजिक , आर्थिक , शैक्षणिक आरोग्यविषयक विवंचनेच्या गर्तेत सापडलेल्या या जमातीची कथा व व्यथा आपले हृदय पिळवटून टाकणारी आहे . नैसर्गिक संपत्तीचा असणारी ही जमात वाढत्या शहरीकरणाचा बळी पडुन आपल्या परंपरागत व्यवसायास व अधिवासास मुकत चालली आहे . पुणे तिथे काय उणे . अशी एक म्हण पुणे जिल्ह्याची प्रगती मोठेपणा सांगण्यासाठी खूप प्रसिद्ध आहे . पण समृद्धीने नटलेल्या याच जिल्ह्यात मात्र कातकरी • जमातीच्या नशिबात केवळ उणेच आहे . अनेक स्वयंसेवी , सेवाभावी सामाजिक संस्था कातकरी जमातीच्या विकासासाठी या जिल्ह्यात कार्यरत आहेत . या सेवाभावी संस्था अहोरात्र या जमातीच्या उद्धारासाठी झटताना दिसून येतात .

प्रत्येक समाजामध्ये त्या समाजातील स्त्रियांचे स्थान त्यांचा दर्जा हा अतिशय महत्त्वपूर्ण समजला जातो . समाज प्रगत असे किंवा अप्रगत कुठल्याही समाजात स्त्री ही उपेक्षितच असते . तिचे दुःख , तिच्या समस्या तिच्या वेदना या सारख्याच दिसून येतात फक्त त्यांची तीव्रता थोड्याफार प्रमाणात बदलत असते . त्यांच्या समस्येची कारणेही बदलत असतात . १९७५ हे वर्ष युनोने ' आंतराष्ट्रीय महिला वर्ष ' म्हणून घोषित केले . युनोने केलेल्या सर्वेक्षणातून महिलांचे सर्वच क्षेत्रातील दुय्यमत्व दिसून आले . त्यामुळे १ ९ ७५ हे आंतराष्ट्रीय महिला दशक जाहीर केले गले श्सत महिलांच्या कल्याणासाठी काही उपक्रम हाती घेण्यात आले . त्यातून महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे त्यांच्यात ध्येये व आत्मविश्वास निर्माण करण्याचे , त्यांच्या पंखांमध्ये बळ देण्याचे काम करण्यात आले . स्त्रिया आपल्या अस्तित्वासाठी धडपडू लागल्या स्त्री मुक्तीसाठी चळवळी उभ्या राहील्या . पण हे केवळ नागरी आणि ग्रामीण कमुदायापुरते मर्यादित होते . यात आदिवासी / वनवासी स्त्रीचा समावेश नव्हता आणि नाही कारण आदिवासी हा मागास समजला जाणारा समाज स्त्रियांच्या बाबतीमध्ये मात्र सुधारणावादी विचारणी स्विकारणारा आहे . कातकरी कुटुंबात महिलांची हुकूमत असते तिला कुटुंबात आणि समाजात पुरुषाच्या बरोबरीने स्थान आहे . तिला दुय्यम स्थान नसून सर्वच निर्णय प्रकीयत तिला सहभागी केले जाते . कातकरी स्त्रियांचे जीवन अतिशय कष्टदायी आहे . नवरा व्यसनी असल्यावर तर मग तिच्या या कष्टा मध्ये अधिकच भर पडते . तिचे हे कष्टदायी जीवन पाहिल्यानंतर तिच्या समस्यांचे स्वरूप ही इतर समाजातील स्त्रियांच्या समस्ये पेक्षा निश्चितच वेगळ्या स्वरूपाचे असतं .

समाजात आणि कुटुंबात पुरुषाच्या बरोबरीने स्थान असल्यामुळे समाजीक दृष्ट्या ती उपेक्षित नाही . पण कष्टदायी जीवन पगणाऱ्या या स्त्रियांचे आपल्या आरोग्याकडे अतिशय दुर्लक्ष होताना दिसून येते . त्यामुळे कातकरी जमातीतील स्त्रियांच्या आरोग्यविषयक समस्येचे स्वरूप फार गंभीर दिसून येते . आरोग्यमधनसंपदा अशी एक प्रसिद्ध म्हण आपल्यापुढे प्रचलित आहे . आरोग्य हीच जर संपत्ती असेल तर मग कातकरी महिला या अतिशय निर्धन आहेत . जर जमीनच सुपीक नसेल तर उत्कृष्ट बीज आणि त्या

बीजापासुन उत्कृष्ट रोपटे कसे तयार होणार ? माताच निरोगी नसतील तर बालकांचे आरोग्य आपोआपच धोक्यात येते . समाज कुठलाही असो तो निरोगी असेल तरच तया समाजाची प्रगती झपाट्याने होत असते . आरोग्यविषयक गंभीर समस्या असणारे नागरिक आपल्या समाजाच्या विकासास हातभार नावू शकत नाहीत . कोणत्याही समाजाची प्रगती करावयाची असेल तर त्या समाजाची शैक्षणिक व आरोग्यविषयक दर्जा सुधारला पाहीजे . देशाच्या भविष्याचा विचार केला तर देशातील बालके महत्त्वाची असून त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही .

कातकरी महिला व बालकांचे आरोग्य :

कातकरी समाजातील महिला व बालकांचे आरोग्य हे एकदुसन्यावर अवलंबून आहे . माता निरोगी व सुदृढ असेल तरच जन्माला येणारी बालके सुदृढ असतील . दारिद्रय आणि कष्टदायी जीवन जगत असताना कातकरी जमातीतील स्त्रिया आपल्या आरोग्याच्या बाबतीत कमालीच्या दुर्लक्ष करताना दिसून येतात . अज्ञान , अशिक्षितपणा , अंधश्रद्धा पूर्वापार चालत आलेल्या प्रथा आरोग्याच्या बाबतीत कमालीच्या उदासीन दिसून येतात . वैयक्तिक स्वच्छता पाळण्याकडे त्या दुर्लक्ष करतात . महिला आणि मुलीमध्ये मासिक पाळीबाबत कमालीचे गैरसमज आणि अंधश्रद्धा असल्याचे दिसून आले . त्यांचा स्वभाव बुजरा असल्याने व मनावर प्रथांचा पगडा असल्याने या स्त्रिया खुलेपणाने आपल्या आरोग्यविषयक समस्येविषयी व्यक्तही होत नाहीत . खास करून पारंपारिक ज्ञान आणि पारंपारीक उपचार पद्धती यामुळे स्त्रियांचे आरोग्य धोक्यात आले आहे . स्वत : च्या आरोग्यविषयक समस्येबाबत ती अज्ञानी असते . अतिशय कष्टदायी व दगदगीच्या दिनक्रमात या स्त्रियांना स्वताकडे लक्ष द्यायला अजिबात वेळ नसतो .

आर्थिक विवंचनेत अडकलेल्या या जमातीतील स्त्रिया आपला आजचा भुखेचा प्रश्न कसा मिटेल या प्रश्नाने त्रस्त असतात . अशावेळी स्वतःकडे लक्ष द्यायचे असते हे कुठेही त्यांच्या गावी नसते . त्यामुळे मासिक पाळीतील रक्तस्त्राव , पांढरे पाणी अंगावर जाणे , समतोल आहाराचा अभाव , वैयक्तिक अस्वच्छता यामुळे त्या अनिमित पेशंट होतात . कातकरी समाजात ● आजही बालविवाह प्रचलित आहे . त्यामुळे अल्पवयीन माता झाल्याने होणारे धोके व आव्हाने यांचे स्वरूप अतिशय गंभीर आहे . हे धोके ओळखून ' युनिसेफ ' या सुयुक्त राष्ट्रसंघाच्या विभागाने १० ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर २०१८ या काळात बालविवाह विरोधी मोहीम सुरू केली होती . या मोहीमेच्या अंतर्गत कातकरी जमातीतही आरोग्यविषयक जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात आले . भारतासारख्या विकसनशील देशात नागरी , ग्रामीण किंवा आदिवासी असो सर्वच समाजात सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न नेहमीच भेडसावत आला आहे . फक्त त्याचे स्वरूप कमी अधिक आहे . आरोग्याचा प्रश्न हा नेहमीच दुर्लक्षित राहीला आहे . सुदृढ नागरिक हे देशाची खरी संपत्ती असते . ज्या देशाचे नागरिक निरोगी तो देशही निरोगी असतो .

एका कार्यक्रमात डॉ . अभय बंग म्हणाले होते , आदिवासी भागातील कोणतेही मुल दगावतं तेव्हा त्याच्या मागे अठरा सामाजिक कारणे असतात . गरीबी , अज्ञान , अंधश्रध्दा , समर्पित डॉक्टरांची कमतरता नजीकच्या आरोग्यसेवेचा अभाव , सरकारची चुकीची धोरण इत्यादी . १ ९ ८४ पासून डॉ . अभय आणि राणी बंग आणि त्यांच्या सर्च टीमने संसाधनाच्या अभावाच्या परिस्थितीत बालमृत्यूदर रोखण्याच्या उपायांवर संशोधन केले . ते म्हणजे पाड्यातील स्थानिक महिला आणि सुईणी

यांनाच नवजात बालकांचे संगोपन करण्याचे प्रशिक्षण दिले . पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात डॉ . मनिषा गुप्ते यांनी मासू संस्थेच्या माध्यमातून स्त्रियांनी स्वतःच्या आरोग्य प्रश्नांवर बोलते केले.

आदिवासी भागातील सध्याचा बालमृत्यूदर ५९.२ एवढा आहे . तो ३६ पर्यंत खाली आणणे आवश्यक आहे . आदिवासी पाड्यांवर आजही सुरक्षित बाळंतपणाच्या सोई उपलब्ध • नाहीत . बाळंतपणात गुदमरून मरणाऱ्या बाळांची संख्याही मोठी आहे . ज्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अस्तित्वात असलेल्या ' आशा कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणात अनेक त्रुटी आहेत . प्रशिक्षणाची भाषा , अत्यल्प वेतन इत्यादी . जगभरातील एकूण ४५ % बालमृत्यू प्रत्यक्ष अप्रत्यक्ष अपुऱ्या पोषमामुळेच होतात . कातकरी महिलांमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण खूपच कमी आहे . सर्दी , ताप , खोकला सर्पदंश यांसारखे त्रासही दिसून येतात .

'मासूम' (२००९) महिला व बालके यांच्या आरोग्यावर केलेला सर्वे :

१.१- ३ अर्भके ही जन्मल्यानंतर एक महिण्याच्या आत मृत्यू पावतात .

२. १३९ महीलांचा सर्वे केल्यानंतर असे निदर्शनास आले की १२१ (५७ %) महिलांची एक किंवा अधिक बालके मृत्यू पावलेली आहेत .

३. ४१ (३० %) महिलांचे गर्भपात झाल्याचे निदर्शनास आलेले आहे .

४. दिलेल्या ' मासूम ' च्या अहवालानुसार अर्भक मृत्यूची कारणे म्हणजे ते कमी वजनाची जन्मजात , तसेच त्यांना विविध आजार झालेले दिसतात . त्यामध्ये न्यूमोनिया , हगवण , कावीळ , मतिमंद आणि साथीचे आजार झालेले असतात . जर बालकाचे निधन एका आठवड्यात झाले तर सटवीमुळे झाले असे समजले जाते .

५. कधी कधी महिलांचे ०६-०६ होतात आणि मग त्या स्त्रीला काही बालके जन्मतात . अश्याप्रमाणे वरील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत .

आदिवासी विकार विभाग अंतर्गत विभागीय व राज्यस्तरीय विविध योजना :

आदिवासी हे दुर्गम भागात वास्तव्यास असल्याकारणाने संपर्का अभावी शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचविणे अडचणीचे आहे . तरीही इतर विकासाबरोबरच महाराष्ट्र शासन आदिवासी भागात आरोग्य सेवा वेळेवर व प्रभाविपणे पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहे . आदिवासी महिलांसाठी शासनाच्या काही आरोग्यविषयक योजना पुढीलप्रमाणे सांगता येतील , १. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NHRM)

२. नवसंजीवनी योजना

३. जननी सुरक्षा योजना

४. जननी शिशु योजना

५. डॉ . ए.पि.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना

६. एकात्मिक बालविकास प्रकल्प योजना

2. संशोधन समस्या विधान :

'कातकरी' जमातीतील महिला व बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास पुणे जिल्हा

3. संकल्पनात्मक व्याख्या :

1. आदिवासी : एका समान भाषेचा वापर करणाऱ्या एकाच पूर्वजापासून उत्पत्ती सांगणा - या , एका विशिष्ट भूप्रदेशात वास्तव्य करणाऱ्या तंत्रशास्त्रीय ज्ञानाच्या दृष्टीने मागासलेल्या अक्षरओळख नसलेल्या व रक्तसंबंधावर आधारित सामाजिक व राजकीय रीतीजिवाजांचे प्रामाणिक पालन करणाऱ्या एकजिनसी गटाला आदिवासी समाज म्हणतात . आदिवासी समिती परिषद , शिलाँग (१ ९ ६२)

2. कातकरी : " जंगलात , डोंगद - यासारख्या दुर्गम भागात वास्तव्यास असणारी एक वन्य जमात जी आपला उदरनिर्वाह जंगलातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर करते . तिला कातकरी जमात असे म्हणतात . झाडाच्या खोडापासून कात तयार करण्याच्या पारंपारिक व्यवसायामुहे ही जमात ' कातोडी ' या नावानेही ओळखली जाते .

3. जमात : " विशिष्ट अशी समान संकृती वैशिष्ट्ये आणि व्यवसाय असलेला समुह म्हणजे जमात वेबस्टर शब्दकोश होय .

3. आरोग्य : " सर्व रोगांपासून मुक्त असलेली शरीराची शारीरीक व मानसिक स्थिती दर्शवणारी अवस्था म्हणजे आरोग्य .

4. समाजशास्त्रीय " मानवी समाजाची रचना व समाजाचा विकास या अनुषंगाने अभ्यास करणारी शाखा .

" संशोधन क्षेत्र व नमूना निवड

प्रस्तुत संशोधन हे कातकरी जमात आढळून येणाऱ्या पुणे जिल्ह्यातीज आंबेगाव , जुन्नर , भोर , मावळ , मुळशी व खेड या ६ तालुक्यांपुरतेच मर्यादित आहे . प्रत्येक तालुक्यातील निश्चित अशा नमुना निवड पद्धतीने कातकरी जमात असलेल्या तालुक्यामधून प्रत्येकी ५ कातकरी पाड्यांची निवड करण्यात येईल . अशा एकूण ३० पाड्यांची अभ्यासासाठी निवड केली जाईल . यासाठी संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत साधा यादृच्छिक नमुना निवडीत लॉटरी पद्धतीचा अवलंब करण्यात येईल .

संबंधित साहित्याचा आढावा :

1. ' कातकरी विकास की विस्थापन ? ' नावाचे पुस्तक मिलिंद बोकील यांनी लिहिले असून या पुस्तकामध्ये लेखकाने कातकरी समाजात मध्ये असलेल्या विविध सामाजिक समस्या आर्थिक समस्या त्यांचे जीवनमान त्यांच्या आरोग्यविषयक समस्या त्यांच्या उदरनिर्वाहाची साधने इत्यादी सर्व गोष्टींचा ऊहापोह केलेला आहे व कातकरी समाज अशा पद्धतीने जीवन जगतो याबद्दल या पुस्तकांमध्ये प्रकाश टाकलेला आहे .

2. डॉ . पुष्पा यशवंत गावीत यांनी आदिवासी संस्कृती , भाषा आणि साहित्य ' हे पुस्तक घेऊन या पुस्तकामध्ये लेखिकेने कातकरी समाज त्यांची संस्कृतो त्यांची भाषा त्यांचे जीवनमान आणि त्यांच्या सामाजिक समस्या या सर्व गोष्टींचा उहापोह सदरील पुस्तकामध्ये केलेला आहे हे पुस्तक कातकरी समुदाय समजून घेण्यासाठी एक अतिशय उत्कृष्ट असे पुस्तक आहे . सदरील पुस्तकामध्ये लेखिकेने कातकरी जमातीचे जीवनमान चित्रित केले असून सखोल असे संशोधन केलेले आहे . फार उपयुक्त आहे .

3. डॉ . सूर्यकांत वाघमारे आणि बिपिन जोजो यांनी Tata Institute of Social Sciences च्या A माध्यमातून एक प्रकल्प लेखन केले असून सदर प्रकल्पातून कातकरी समुदाय व कातकरी अडचणींचा सविस्तर आढावा पुस्तकातून घेतला आहे . सदरील रिपोर्ट PRO समुदाय विविध 20100 कातकरी समुदायांच्या विविध समस्या समजून घेण्यासाठी उपयुक्त अहवाल आहे .

4. ' मासूम ' या सामाजिक संघटनेने कातकरी समाजातील बालमृत्यूचे प्रमाण व बालकांच्या संबंधित आरोग्यविषयक समस्या या याविषयी विस्तृत असा अहवाल तयार केलेला असून या अहवालात कातकरी समुदायातील बालकांच्या मृत्यूची विविध कारणे व बालकांच्या आरोग्यासंबंधी च्या विविध समस्या बद्दल सविस्तर विवेचन केले आहे .

5. डॉ . अभय बंग यांनी ' योजना ' मासिकातून वारंवार कातकरी जमातीबद्दल विविध अंकातून लिखाण केले आहे . या अंकातून कातकरी जमातीच्या विविध पैलूवर प्रकाश टाकण्याचे काम बंग यांनी केले आहे . योजना मासिक सुधा कातकरी जमातीचे आकलन करून घेण्यासाठी उपयुक्त असे मासिक आहे .

5. संशोधनाची उद्दिष्टे :

1. कातकरी जमातीतील महिलांचे आरोग्य व आरोग्य विषयक समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे ,

2. पुस्तकात कातकरी जमातीतील बालकांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे .

3. कातकरी जमातीतील महिला व बालकांच्या विविध अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे

4. कातकरी समाजातील अडचणींचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे

5. कातकरी जमातीला विकासाच्या मूळ प्रवाहामध्ये समाविष्ट करून घेणे .

6. गृहीतकृत्य

1. कातकरी जमातीतील महिला व बालकांच्या आरोग्य विषयक समस्या गंभीर आहेत .

2. कातकरी महिला व बालके यांचे आरोग्य हे कातकरी जमाती समोरील मोठे आव्हान आहे **7. संशोधनाचे महत्त्व / गरज :** कातकरी समाज हा मूळ प्रवाहापासून पूर्णता दूर आहे या समाजाला मूळ प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांच्या आरोग्यविषयक अडचणी समजून घेणे आवश्यक आहे . आपण त्यांचा व्यवस्थित अभ्यास केला तर आपल्याला यांच्या विकासामध्ये हातभार लावणे शक्य होते व या जमातीला मूळ प्रवाहामध्ये आणणे शक्य होते . विकासापासून कोसो दूर असलेल्या समाजात नेमके काय चाल हे समजून घेणे व त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे म्हणून हे संशोधन अतिशय गरजेचे आणि महत्त्वाचे आहे . सुदृढ समाज केव्हा निर्माण होऊ शकतो जेव्हा त्या समाजातील बालके निरोगी व आरोग्यदायी असतील , बालकांच्या आरोग्य विषयक समस्या समजावून घेऊन त्यावर उपाय शोधणे या संशोधनामुळे शक्य होऊ शकते म्हणून हे संशोधन कातकरी जमातीला आरोग्यदायी व निरोगी बनवण्यासाठी महत्वाचे ठरेल .

कातकरी जमात ही डोंगर – दऱ्या आणि जंगल या मध्ये वास्तव्य करत असून त्यांच्या समस्या समजून घेतल्या शिवाय आपण त्यांचा विकास करू शकत नाही म्हणून हे संशोधन कातकरी जमातीच्या विकासासाठी नक्कीच उपयुक्त ठरेल . कातकरी जमातीच्या विविध अडचणी समजून घेतल्यानंतर आपण त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देऊ शकतो आणि त्यांना मूळ प्रवाहामध्ये घेऊन येऊ शकतो त्यामुळे हे संशोधन कातकरी समाजाच्या विकासामध्ये नक्की हातभार लावेल म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे . या संशोधनामुळे कातकरी समाजाच्या ज्या काही अडचणी आहेत त्या अडचणी सहजासहजी समोर येतील त्यावर उपाय शोधणे शक्य होईल म्हणून हे संशोधन कातकरी समाजाच्या विकासासाठी अतिशय उपयुक्त ठरेल . या अभ्यासामध्ये कातकरी जमातीला जे डॉक्टर आरोग्य विषयक सल्ला मार्गदर्शन करतात त्यांच्याही मुलाखती घेतल्या जातील आणि त्यांच्याकडून आपल्याला कातकरी जमाती मधील महिला व बालक यांचे आरोग्य आपल्या लक्षात येईल व त्यावरून त्यांना निरोगी बनवण्यासाठी योग्य ती

काळजी घेणे शक्य होईल म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे . कातकरी जमातीच्या समस्या समजून घेतल्यानंतर त्या समस्यावर उपाय शोधून त्यांचे सबलीकरण करणे शक्य होईल म्हणून हे संशोधन उपयुक्त ठरू शकते . कातकरी जमात मुख्य प्रवाहापासून खूप दूर असल्यामुळे तसेच जंगलात राहत असल्यामुळे तो शहरी भागापासून दूर राहत असल्यामुळे त्यांच्या बद्दलची माहिती आपल्याला मिळत नाही म्हणून हे संशोधन कातकरी समुदायावर प्रकाश टाकण्यासाठी खूप उपयुक्त असेल . S * कातकरी जमातीचे जीवनमान आपल्या लक्षात आल्यानंतर शासनाला कातकरी जमातीच्या बाबतीमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यास मदत होऊ शकते म्हणून हे संशोधन शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते . जेणेकरून कातकरी समुदायाची जीवनमान उंचावले जाऊ शकते व त्यांच्या आरोग्यविषयक समस्या वर उपाय शोधून त्यांना आरोग्य दायी जीवन जगण्यास आपण मदत करू शकतो . अशा पद्धतीने हे संशोधन कातकरी समुदायाच्या जीवनात बदल करण्यासाठी एक क्रांतिकारी संशोधन होऊ शकते म्हणून हे संशोधन अतिशय महत्वाचे व गरजेचे आहे .

8. **संशोधन पद्धती :** संशोधन करत असताना विविध पद्धतीचा अवलंब करायला लागते . या पद्धतीच्या माध्यमातून तथ्य संकलन करावे लागते . तथ्य संकलन करते वेळी खालील पद्धतींचा उपयोग केला जाईल

1. **वर्णनात्मक पद्धत**– तथ्य संकलन करण्यासाठी वर्णनात्मक पद्धत हो अतिशय उपयुक्त असून या पद्धतीच्या सहाय्याने ज्या गोष्टींचे निरीक्षण केले आहे त्या गोष्टींचे वर्णन केले जाईल व त्या माध्यमातून संशोधन कार्यास गती प्राप्त होईल . संशोधन करतेवेळी काही निवडक वाडया वस्त्या व पाड्यांना भेटी दिल्या जातील व त्यांचे वर्णन करून तथ्य संकलन केले जाईल .
2. **निरीक्षण पद्धती–** अगोदर सांगितल्याप्रमाणे काही निवडक खेडे वाड्या व पाडे निवडले जातील व त्यांना भेटी दिल्या जातील . सदरील भेटीदरम्यान त्या पाड्यांची निरीक्षण केले जाईल व त्यासोबतच तेथील स्त्रिया व बालके यांच्या आरोग्यविषयक समस्या समजून घेतल्या जातील व त्या निरीक्षणातून ज्या बाबी समोर येतील त्या गोष्टींच्या आधारे संशोधन केले जाईल . अशा पद्धतीने निरीक्षण ही पद्धत संशोधनासाठी अतिशय उपयुक्त अशी पद्धती सिद्ध होईल म्हणून या संशोधनासाठी निरीक्षण पद्धतीचा अवलंब केला जाईल .
3. **विश्लेषणात्मक पद्धती**– संशोधन करते वेळी विश्लेषणात्मक पद्धतीचा पण उपयोग केला जाईल . जे काही तथ्य वेगवेगळया पद्धती वापरून गोळा केलेली आहेत त्यांची सत्यता पडताळण्यासाठी त्याचे विश्लेषण केले जाईल आणि मग त्या माहितीच्या आधारे संशोधन केले जाईल . वेगवेगळया गोष्टींचे विश्लेषण केल्यानंतर पाहिजे ती माहिती आपल्याला मिळेल आणि त्या माहितीच्या आधारे संशोधन केले जाईल अशा पद्धतीने संशोधनामध्ये विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केला जाईल व ही पद्धती संशोधनासाठी अतिशय उपयुक्त सिद्ध होईल .

तथ्य संकलनाची तंत्रे :

प्राथमिक स्त्रोत : प्रस्तुत संशोधनाची प्राथमिक माहिती मिळविण्यासाठी निवडलेल्या कातकरी पाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील आरोग्य विभागात कार्यरत असणारे डॉक्टर आशा वर्करस , शिक्षक , अंगणवाडी सेविका , पाड्यातील प्रतिनिधी , कातकरी महिला यांच्याकडून तथ्य संकलनाची मुलाखती , अनुसुचि , निकरक्षण व प्रश्नावली ही तंत्रे वापरून तथ्य संकलन केले जाईल .

दुय्यम स्त्रोत : • दुय्यम सामुग्रीच्या उपलब्धतेसाठी विविध ग्रंथालय , सेवाभावी संस्था , नियतकालिके , मासिके , आरोग्य विभागाचा अहवाल , संशोधन पत्रिका इत्यादीचा वापर केला जाईल .

10. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा : •

संशोधन क्षेत्राचा आवाका मोठा असेल तर सुक्ष्म निरिक्षण काढणे अवघड जाते . म्हणून संशोधन क्षेत्राची व्याप्ती निश्चित करणे आवश्यक आहे .

• प्रस्तुत संशोधनात फक्त पुणे जिल्ह्यात आढळून येणाऱ्या कातकरी जमातीतील महिलांच्या आरोग्य विषयक समस्यांचा अभ्यास केला जाईल .

* प्रस्तुत संशोधनात निवडलेल्या कातकरी पाड्यामधील 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके आरोग्यविषयक समस्यांचा आढावा घेतला जाईल .

• प्रस्तुत संशोधनाचा कालावधी हा मार्च 2022 ते मार्च 2025 या दरम्यान असणार आहे .

11. संभाव्य प्रकरणीकरण

प्रकरण 1 प्रस्तावना

या प्रकरणांमध्ये प्रस्तावना , व्याख्या संशोधनाची गरज संशोधनाची उद्दिष्टे गृहीत कृत्य , संशोधनाची व्याप्ती व मर्यादा व संशोधन पद्धती या बाबीचा उल्लेख असेल .. **प्रकरण 2 संबंधित साहित्याचा आढावा**

या प्रकरणांमध्ये कातकरी समाज व त्यांच्या विविध पैलू विषयी जे काही लिखाण व संशोधन झालेले आहे त्या सर्व बाबींचा आढावा या प्रकरणांमध्ये घेतला जाईल

प्रकरण 3. कातकरी महिलांच्या आरोग्य विषयक समस्या

या प्रकरणांमध्ये कातकरी महिलांचा ज्या काही आरोग्यविषयक समस्या आहे त्या समस्यांचा आढावा घेतला जाईल .

प्रकरण. 4. कातकरी बालकांच्या आरोग्य विषयक समस्या

या प्रकरणांमध्ये कातकरी जमातीच्या बालकांच्या ज्या काही समस्या आहेत त्या सर्व समस्यांचा सखोल आढावा घेतला जाईल व त्यावर उपाय योजना काय केल्या जाऊ शकतात तेही सांगितलं जाईल .

5. संशोधनाचे फलित , शिफारशी व समारोप

या प्रकरणांमध्ये संशोधनाचे फलित काय आहे ते सांगितले जाईल त्यासोबतच ज्या काही शिफारशी कातकरी समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक आहे त्या सांगितल्या जातील तसेच संशोधनाचा समारोप या प्रकरणामध्ये केला जाईल .

12. वेळापत्रक

अ.क्र.	कालावधी	संभाव्य काम
1	28/07/2021 To 31/12/2021	RAC . कोसंवर्क परीक्षा निकाल व प्रबंधाचे वाचन
2	01/01/2022 To 30/06/2022	सिनपसोस तयार करणे , RRC मीटींग , सिनोपसिस सादर करणे व संबधीत साहीत्याचा आढावा पहिला प्रगती अहवाल सादर करणे .
3	01/07/2022 To 31/12/2022	दुसरा प्रगती अहवाल सादर करणे प्रश्नावली तयार कर्ण व वाटप करणे
4	01/01/2023 To 31/06/2023	तिसरा प्रगती अहवाल सादर करणे तथ्य संकलन करणे , तथ्याचे विश्लेशन करणे प्रकरण पहिले लिहिणे
5	01/07/2023 To 30/06/2024	चौथा संशोधन प्रगती अहवाल सादर करणे , प्रकरण दूसरे तिसरे , चौथे व पाचवे लिहणे
6	01/01/2024 To 30/06/2024	पाचवा संशोधन प्रगती अहवाल सादर प्री . पीएच.डी. मुलाखत अंतिम सिनॉपसिस सादर करणे
7	01/07/2024 To 28/07/2024	सहावा संशोधन प्रगती अहवाल सादर करणे , पीएच.डी. कायका वडिग्री आवार्ड

संदर्भ ग्रंथ सूची :

1. आगलावे , प्रदीप , (2000) संशोधन पद्धती व तंत्रे , नागपूर विद्या प्रकाशन .
2. बोकील , मिलिंद , (2006) कातकरी विकास की विस्थापन ? मौज प्रकाशन मुबई .
3. गावीत , पुष्पा , (2014) , आदिवासी संस्कृती भाषा आणि साहित्य अथर्व पब्लिकेशन्स धुळे .
4. बंग , अभय , (2016) , योजना मासिक ,
5. कुलकर्णी , पी.के. (2006) , आरोग्य आणि समाज .
6. नरगोलकर , कुसुम व वसंत नरगोलकर (1955) , जंगलचे राजे , श्री मौनी विद्यापीठ गारगोटी .
7. साठे , विजय (2004) , कातकऱ्यांच्या सामाजिक , आर्थिक विकासाचे आव्हान कोण पेलणार ? साधना साप्ताहीक
8. कनकमेडला , निखिल (2019) , Who Are The Katkaris (Article)
9. पी.एच.डी. थिसिस , युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे
10. धुर्ये . जी.एस. (1979) , कास्ट अँड रेस इन इंडिया पॉप्युलर प्रकाशन , मुबई .
11. चापेकर , एल.एन. (1960) , ठाकूर्स ऑफ द सह्याद्री . ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस , बॉम्बे ,
12. वानखेडे , आरती (2021) , आदिवासी कातकरी लोकसाहित्य . कैलाश पब्लिकेशन दिल्ली .
13. तुळपुळे , प्रभा (2003) , कथा कातकरी जीवनाची साधना साप्तीहीक .
14. वाघमारे , सूर्यकांत , जो जो (2014) साशिओ- इकॉनॉमिक इश्यूज फेसिंग कातकरी . अ रिपार्ट बाय टाटा इन्स्टीट्यूट ऑफ सोशल साईसेस मुंबई .
15. ' मासूम ' महिला व बालके यांच्या आरोग्यावर केलेला सर्वे

संशोधक
कदम सुनंदा वैजनाथ
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय ,लातूर .

मार्गदर्शक
डॉ . मोटे अशोक अर्जुनराव
सहयोगी प्राध्यापक,
शिवाजी महाविद्यालय,रेणापूर,जि.लातूर